# श्री दत्तजयंती – विज्ञान आणि अध्यात्म

बापट गुरुजी

मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला श्री दत्तात्रेय जयंती साजरी करण्याची परंपरा आहे. या दिवशी प्रत्येक दत्त स्थानावर मोठ्या संख्येने भक्त एकत्र येतात आणि श्री दत्त जयंतीचा सोहळा साजरा करतात. याच प्रकारे श्रीरामनवमी, गोकुळाष्टमी, हनुमानजयंती असे वेगवेगळ्या ईश्वरी अवतारांचे जन्मदिन आपण साजरे करतो. सोहळ्याच्या प्रसंगी विविध विधी केले जातात. तसेच दर्शन आणि प्रसादाचा कार्यक्रमही असतो. पण असे सोहळे साजरे करण्यामागचे ज्ञान जर समजावून घेतले नाही तर तो निव्वळ एक निर्हेतुकपणे केलेला उपचार किंवा मनोरंजनाचा कार्यक्रम ठरण्याची शक्यता असते. तसं होऊ नये म्हणून श्री दत्तजयंतीच्या दिवशी या त्रिगुणात्मक शक्तीमागे असणारं अध्यात्म, विज्ञान यांचं ज्ञान प्रत्येक दत्तभक्ताने आवर्जून समजून घ्यायला हवं.

ठराविक दिवशी, ठराविक वेळेला ईश्वरी प्रतीकांचा जन्मसोहळा साजरा करण्यामागे निश्चित असं विशेष ज्ञान अर्थात विज्ञान आहे. याला वेळेचे समगतीस्पंदन (Time resonance) असं म्हणता येईल. जीवशास्त्रानुसार आपल्यापैकी प्रत्येक मनुष्यात एक जैविक घड्याळ (biological clock) असते. हे घड्याळ सतत चालू असते आणि त्या घड्याळाबरहुकुम तो मनुष्य विशिष्ट वेळेला जागा होतो, जेवतो, झोपतो किंवा इतर क्रिया करतो. या जैविक घड्याळामागे जशा अनेक दिवसांच्या सवयी असतात, तसेच निसर्गातील इतर घटकही असतात. या घड्याळानुसार निश्चित झालेलं वेळापत्रक जर बिघडलं तर मनुष्याचं शरीर बंड करतं, मनही बंड करतं आणि तो अस्वस्थ होतो. त्याला वेगवेगळी दुखणीही जडू शकतात. अर्थात सत्कर्म करण्यासाठी आपण त्या घड्याळात संकल्पपूर्वक बदल करू शकतो. यातलं तात्पर्य एवढंच की दिवस-रात्रीतल्या वेगवेगळ्या वेळांना ते ते कार्य करून घेण्यासाठी शरीरात त्या त्या प्रकारची शक्ती कार्यान्वित होते. साधनेसाठीसुद्धा विशिष्ट वेळाचे किंवा स्थळाचे सातत्य राखा असं जेव्हा सत्पुरुष सांगतात तेव्हा त्यामागे जैविक घड्याळाचं विज्ञान असतं. समजा एखादा मनुष्य रोज सकाळी पाच वाजता उठून सातत्याने साधना करतो आहे असं गृहीत धरलं तर त्या निशिष्ट वेळेला व विशिष्ट ठिकाणी वातावरणात ती ईश्वरीय शक्ती उपस्थित होते आणि साधकाला साधना करण्यासाठी प्रोत्साहित करते, मदत करते. म्हणून एक वेळ ठरवून, एका विशिष्ट जागी बसून, विशिष्ट दिशेला तोंड करून साधना करावी असं शास्त्र सांगतं.

कालचक्राचा हाच नियम निसर्गातही दिसून येतो. निसर्गात दिवस रात्रीचं चक्र असतं, ऋतुमानाचंही चक्र असतं. समुद्रातील भरती ओहोटी देखील कालचक्राप्रमाणेच येत असते. शरीरातल्या पेशीसुद्धा दर नव्वद दिवसांनी बदलतात असं आधुनिक वैद्यकशास्त्र सांगतं. संपूर्ण विश्वाची गती चक्राकार आहे आणि अखिल ब्रह्मांडातले हे कालचक्र वर्तुळाकार गतीने अव्याहतपणे सुरू आहे. खरं तर या विश्वाचा आणि त्याच्या गतीचा थांग लागत नाही. तरीही प्रत्येक संस्कृतीने तारे-ग्रह-नक्षत्र यांचा अभ्यास करून कालगणनेची स्वत:ची स्वतंत्र पद्धत निर्माण केली आहे. प्राचीन भारतीय खगोल शास्त्रज्ञांनी सूर्यमान आणि चांद्रमानाचा अभ्यास करून दिवस, तिथी, महिना, नक्षत्र आणि राशींवर आधारित अशा चांद्र-सौर कालगणना पद्धतीचा समन्वय साधला आहे तर पाश्चात्य कालगणना फक्त सौरमानावर आधारित आहे.

यातली कोणतीही कालगणना ग्राह्य धरली तरी एक निश्चित आहे की सर्वसाधारणपणे तीनशे साठ दिवसांच्या कालावधीनंतर पृथ्वीवरच्या कालगणनेचं एक चक्र म्हणजे एक वर्ष पूर्ण होतं. हा कालावधी शुक्रावर कमी असेल तर गुरु या ग्रहावर तो जास्त असेल. याचाच अर्थ पृथ्वीतलावर विशिष्ट वेळी जर चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्र एका विशिष्ट स्थानी येत असतील तर त्या तिथीला, त्या मितीला अवतरित झालेली विशिष्ट चेतन शक्तीसुद्धा, जेव्हा त्याच तिथी-वेळाचं गणित साधलं जाईल, तेव्हा पुन: पुन्हा आविर्भूत होऊ शकते. त्यावेळी त्या शक्तीवर जर अहंकारशून्यता निर्माण करून

एकाग्रता साधता आली तर ती शक्ती साधकातही त्या त्या प्रमाणात स्फुरित होते. या अदृश्य शक्तीच्या प्रत्यक्ष प्राकट्यातही एक निसर्ग नियम सामावलेला असतो. तो असा की प्रत्येक अदृश्याला व्यक्त होण्यासाठी दृश्याची आवश्यकता भासते, प्रकट होण्यातही चैतन्याला जडाची आवश्यकता असते. त्यामुळे विशिष्ट दिवशी, विशिष्ट वेळी अवतरित झालेली ही शक्ती कोणत्या ना कोणत्या दृश्य वस्तूमध्ये, मूर्तीमध्ये किंवा व्यक्तीमध्ये प्रादुर्भूत होते. मात्र अवतरित झालेल्या या चैतन्याची जाणीव देहभावना दृढ असलेल्या साधकाला होतेच असं नाही.

अहंकाराच्या बाधेमुळे त्या सर्वश्रेष्ठ शक्तीच्या शुभ संसर्गापासून आपण वंचित राहू नये, म्हणून सगुण-निर्गुण, व्यक्त-अव्यक्त वगैरे सगळे विकल्प दूर सारून, दत्त जयंतीच्या दिवशी उपासनेसाठी एकत्र येणाऱ्या प्रत्येक साधकाचा हेतू एकच असावा, की ती परमोच्च अशी दत्तशक्ती माझ्यातही, निदान काही प्रमाणात तरी प्रादुर्भूत व्हावी. ती अहंकारशून्यता साधण्यासाठी प्रथम दत्तप्रतीकामागील विज्ञान समजून घेणं आवश्यक आहे.

**श्रीदत्त प्रतीकातले विज्ञान** – मूळ ईश्वरी शक्ती निर्गुण निराकार आहे परंतु तिची भक्ती सामान्य माणसासाठी अतिशय क्लेशदायक ठरू शकते. भगवान श्रीकृष्णांनी नेमकं हेच श्रीमद्भगवद्गीतेत सांगितलं आहे. सामान्य मनुष्याला ईश्वराची भक्ती करणं, उपासना करणं शक्य व्हावं म्हणून अत्यंत अभ्यासपूर्वक, ज्ञानपूर्वक वेगवेगळ्या ईश्वरी प्रतीकांची निर्मिती भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळी करण्यात आली. भगवान दत्तात्रेयांच्या 'तीन शीरे सहा हात' या विशिष्ट प्रतीकामागे सुद्धा विशिष्ट इतिहास आहे. प्रभु रामचंद्र, योगेश्वर कृष्ण किंवा भगवान परशुराम या महापुरुषांना आपण ईश्वर मानतो कारण त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाने समाजासमोर एक महान आदर्श निर्माण केला. समाजातल्या ज्याने ज्याने या महापुरुषांवर, त्यांच्यातल्या गुणांवर एकाग्रता साधण्याचा प्रयत्न केला त्या त्या प्रत्येकात ते महान ईश्वरी गुण स्फुरित झाल्याशिवाय राहिले नाहीत. हे मानवी देहातले ईश्वरी अवतार आहेत. मानवी देहात असल्यामुळे त्यांच्यात अल्प का होईना विषमता शिल्लक होती. श्री दत्तात्रेयांच्या लीलावताराला मात्र मानवी देहाच्या मर्यादा नसल्यामुळे हा अवतार परिपूर्ण मानण्यात येतो.

श्री दत्तात्रेयांची तीन मुखं अनुक्रमे सत्त्व, रज आणि तमोगुणाचे प्रतिनिधित्व करतात. या विश्वाचा व्यापार या तीन गुणांवर अवलंबून आहे असं भारतीय अध्यात्म सांगतं. स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ या त्रिलोकांमध्ये या तीन गुणांचं साम्राज्य असतं. यातल्या प्रत्येक गुणाला अनुसरून विशिष्ट ईश्वरी प्रतीकाची योजना आपल्या संस्कृतीने केली आहे. सत्त्वगुणाला महाविष्णूंचं रूप, रजोगुणाला ब्रह्मदेवाचं रूप तर तमोगुणाला शंकरांचं साकार रूप देण्यात आलं. पुढे या विशिष्ट सगुण रूपांना डोळ्यांसमोर ठेवून साधना करणाऱ्यांचे वेगवेगळे पंथ, संघ आणि काही प्रमाणात धर्मही निर्माण झाले. त्यांची आपापसात द्वंद्वं सुरू झाली. वास्तविक पहाता ज्या ऋषीमुनींनी या साधना करायला सांगितल्या त्यांना हे मुळीच अपेक्षित नव्हतं. कारण कोणत्याही विशिष्ट ईश्वरी प्रतीकाचा किंवा साधनेचा दुरभिमान साधकाला समतेऐवजी विषमतेकडे घेऊन जातो. या गुणाची आवश्यकता आहे, त्याचे स्फुरण होण्यासाठी त्या गुणाचे प्रतीक निवडून त्यावर साधना करावी एवढंच तिथं अपेक्षित होतं.

वस्तुत: मनुष्याच्या जीवनात या तीनही गुणांची आवश्यकता असते. कुठल्याही एकाच गुणाचा जर प्रादुर्भाव झाला तर तो मनुष्य समाजाचा एक घटक म्हणून जगण्याच्या लायकीचा रहात नाही. तो व्यावहारिक पातळीवर पूर्णत: अयशस्वी ठरतो. त्यामुळे या तीनही गुणांचा समतोल साधणं जीवनात अतिशय आवश्यक ठरतं. असा समतोल असेल तर कारणपरत्वे एखाद्या गुणाची वृद्धी करता येते. उदाहरणार्थ प्रभु रामचंद्रांना रावणाचा वध करण्यासाठी स्वत:मध्ये तमोगुणाची वृद्धी करावी लागली, अन्यथा त्यांना तो वध करता आलाच नसता. नुसत्या सत्त्वगुणाचं प्रमाणाबाहेर आधिक्य झालेल्या अर्जुनाला श्रीकृष्णाने उपदेश केला की, ''तू असा गलितगात्र होऊन माझ्यासमोर जो बसला आहेस त्याचा काही उपयोग नाही.'' आयुर्वेदही हेच सांगतो की कफ, पित्त, वात यांपैकी कोणत्याही एका तत्त्वाचं आधिक्य झालं असता शरीरात दोष उत्पन्न होतो. सामान्य मनुष्याला भौतिक जीवन जगायला आणि आध्यात्मिक जगतात प्रगती करायला साहाय्यभूत ठरणारे, त्रिदोषांचे संतुलन आणि त्रिगुणांचा समतोल साधलेले ईश्वरी प्रतीक म्हणजे श्रीदत्तात्रेय!

महर्षी अत्री आणि माता अनसूयेने या सुंदर प्रतीकाची निर्मिती केली. त्यानंतर वर्षानुवर्षे अनेक भक्तांनी केलेल्या नामजपामुळे, मंत्रोच्चारणामुळे, साधनेमुळे या प्रतीकाला आकारही मिळाला आणि अनेक संतपुरुषांना ध्यानावस्थेत त्याचे दर्शनही घडले. दत्तजन्माची पुराणात सांगितलेली कथा म्हणजे, 'अहं तुभ्यं मया दत्त:' म्हणजे 'मी तुम्हाला स्वत:ला देतो' असं वरदान देऊन महर्षी अत्री आणि माता अनसूयेच्या

पोटी श्री दत्तात्रेय नामक त्रिगुणात्मक वैश्विक शक्ती अवतीर्ण झाली. अत्री ऋषींपासून निर्माण झालेला तो आत्रेय. 'त्रि' म्हणजे तीन. भारतीय संस्कृतीमध्ये या त्रिपुटीला अतिशय महत्त्व आहे. जीव-जगत् आणि जगदीश्वर ही त्रितत्त्वे, सत्त्व, रज आणि तम हे त्रिगुण, वात, पित्त आणि कफ हे त्रिदोष, भूत, भविष्य आणि वर्तमान हे त्रिकाळ, स्वर्ग, मृत्यु,पाताळ हे त्रिलोक अशा कित्येक त्रिपुटींच्या अधिग्रासांच्या अतीत असणारा तो अ-त्रि. या अत्रिचा जेव्हा असूयाविरहित अनसूया नामक वृत्तीशी संयोग होतो तेव्हा निर्माण होतो जगत्कल्याणकारी दत्तात्रेय! हाच त्रिगुणांमध्ये अडकलेल्यांना त्रिगुणातीत होण्याचा मार्ग दाखवतो.

भगवान दत्तात्रेय अथवा अवधूत अवतार यांचा उल्लेख वस्तुत: अतिप्राचीन काळात निर्माण झालेल्या ग्रंथांमध्येही आढळतो. पण त्यांच्या 'तीन शिरे सहा हात' या प्रतिमेचा प्रसार त्या मानाने अलिकडच्या काळात तत्कालीन समाजाला एकसंध करण्याच्या दृष्टीने झाला असं इतिहास सांगतो. अद्वैत वेदांताच्या प्रसारामुळे वैष्णव, शैव आणि इतर पंथियांमधली एकात्मता निर्माण व्हायला निश्चितपणे मदत झाली. पण विविध पंथीय आणि सांप्रदायिक भक्तांना एकत्र आणण्याचं खरं कार्य घडलं ते श्री दत्तात्रेयांच्या त्रिमुख स्वरूपातल्या सगुण भक्तीमुळे. आज श्रीदत्तात्रेयांची आराधना तळागाळातल्या भक्तांपासून ते योगशास्त्रनिपुण उच्चविद्याविभूषित अशा सर्व साधकांपर्यंत सामान्य वर्गातील सर्वजण करतात.

हिंदू धर्मात जसे दत्तभक्त आहेत तसेच इतर धर्मियांमध्येही श्रीदत्तात्रेयांचे उपासक आढळतात. श्रीदत्तात्रेयांना आपण तुळशीमाळ अर्पण करतो तसंच बेलाचं पानही वाहतो. त्यांच्यासमोर विष्णुसहस्रनाम म्हटलं जातं तसंच रुद्रपठणही केलं जातं. इथे मंत्रशक्ती मान्य आहे, तंत्रशक्ती मान्य आहे आणि यंत्रशक्तीही मान्य आहे. या उत्कृष्ट अशा प्रतीकावर जर आपण नाम, ध्यान किंवा इतर साधना एकाग्रतापूर्वक करू शकलो तर ते प्रतीक प्रत्यक्ष ध्यानाकार (thought form) धारण करून आपल्याला मदत करायला येतं यात काही शंका नाही. आधुनिक विज्ञानही ही शंका घेऊ शकत नाही आणि अध्यात्माने तर अशी शंका कधीच घेतली नाही.

**दत्तशक्ती ग्रहणाच्या पूर्व अटी** – दत्त जयंतीच्या दिवशी या श्रेष्ठ प्रतीकावर एकत्र येऊन केलेली साधना फार ताकदवान असते. ज्या प्रमाणात आपण आपल्या घरगुती, कौटुंबिक अथवा व्यक्तिगत अडचणी विसरून त्या प्रतीकावर एकाग्रता साधू त्या प्रमाणात ती शक्ती आपल्याला निश्चितपणे मिळणार यात काही शंका नाही. अर्थात त्याकरता काही पूर्व अटींचंही पालन करता यायला हवं. श्रीदत्तात्रेयांचं प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ते त्रिगुणात्मक असूनही त्रिगुणातीत आहेत. चिरंतन अशी ही दत्तशक्ती वातावरणात जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी अशी सर्व ठिकाणी भरून राहिली आहे. आपल्याकडे म्हणतात की अमक्याची आठवण झाली आणि लागलीच तो दत्त म्हणून समोर उभा राहिला! याचा अर्थ श्री दत्तात्रेय सर्वव्यापी असून सर्व ठिकाणी, सर्वकाळ उपस्थित असतातच. म्हणून त्यांना 'स्मर्तृगामी' असं म्हटलं जातं. ही शक्ती वातावरणात सगळीकडे भरून राहिलेली आहे हे खरोखर आपल्या मनामध्ये, चित्तामध्ये खोल बिंबवलं गेलं पाहिजे, ही शक्तिग्रहणाची प्रथम अट आहे.

नवनाथांपैकी एक असणाऱ्या गोरक्षनाथांना श्रीदत्तात्रेयांनी दर्शन देऊन नेमकं हेच ज्ञान दिलं अशी एक कथा प्रसिद्ध आहे. श्री गोरक्षनाथ एकदा सौराष्ट्रात सोमनाथाच्या दर्शनास जात असताना वाटेत गिरनार येथे उतरले. तेथे त्यांना कळले की त्यांचे परात्पर गुरु म्हणजे श्रीदत्तात्रेय तेथील गुहेत सध्या वास करून आहेत. त्यांच्या दर्शनासाठी ते गिरनार पर्वतावर गुहेच्या शोधार्थ गेले. तिथल्या निसर्गरम्य परिसरात एका गुहेसमोर त्यांना एक दाढीमिशा वाढलेला, तेजस्वी, वयाने वृद्ध असलेला सत्पुरुष दिसला. गोरक्षनाथांना शंका आली की येथे अनेक गुहा व अनेक सत्पुरुष असताना हे जडवत् दिसणारे जटाधारी सत्पुरुष श्रीदत्तात्रेय कशावरून असतील? त्या सत्पुरुषाशी बराच वेळ वार्तालाप झाल्यानंतरसुद्धा गोरक्षनाथांना हे सत्पुरुष म्हणजे साक्षात दत्तगुरुच आहेत याचं ज्ञान झालं नाही. याचं कारण त्यांना त्यांच्याकडं असणाऱ्या सिद्धींचा गर्व झाला होता!

ते तिथेच श्रीदत्तात्रेयांची वाट बघत बसून राहिले. मग श्रीदत्तात्रेयांनी आपल्या भक्ताच्या अहंकाराच्या परिहारासाठी आपल्या मायेचे जाळे पसरले. प्रथम गंमत म्हणून गोरक्षनाथांनी आपल्या सिद्धींचे प्रदर्शन त्या सत्पुरुषांना घडवायला सुरुवात केली. त्या सत्पुरुषाच्या सिद्धी आपल्या सिद्धीपेक्षाही वरचढ आहेत हे लक्षात आल्यावर, त्यांची परीक्षा करावी म्हणून गोरक्षनाथांनी त्यांना आव्हान दिले, ''चला, आपण लपंडाव खेळू. आधी मी लपतो. तुम्ही डोळे मिटा आणि तीन टाळ्या वाजवा. तिसरी टाळी वाजवून झाली की डोळे उघडा. तेवढ्या वेळात मी लपून बसायचे आणि तुम्ही मला शोधायचे.'' झालं! त्या सत्पुरुषाने डोळे बंद करून तीन टाळ्या वाजविण्याच्या आत गोरक्षनाथ स्वत:च्या सिद्धीच्या बळावर गुप्त झाले. त्या सत्पुरुषाने डोळे उघडताच

आपल्या कमंडलूखालची माती काढली आणि त्या मातीत दडलेल्या बेडकाला हातात धरून विचारलं, ''काय रे? शोधलं ना तुला बरोबर?'' म्हणजे त्यांनी एका क्षणातच गोरक्षनाथांना शोधून काढलं होतं.

आता लपायची पाळी त्या सत्पुरुषांची होती. गोरक्षनाथांनी डोळे मिटताच ते सत्पुरुष गुप्त झाले. गोरक्षनाथांनी डोळे उघडून शोधायला सुरुवात केली पण त्यांना त्या सत्पुरुषाच्या अस्तित्वाचा काहीच पत्ता लागेना. फक्त त्यांना एकच जाणीव झाली की बहुदा हे कमंडलूमध्ये कुठेतरी दडले असावेत. म्हणून त्यांनी कमंडलूतलं सगळं पाणी गाळलं. त्यानंतर मच्छराचं रूप धारण करून त्या कमंडलूचा आतून शोध घेतला. बराच वेळ सूक्ष्मदृष्टीने शोधूनही ते सत्पुरुष काही त्यांना सापडले नाहीत. तेव्हा त्यांनी आपली हार मान्य केली.

हरण्याची कबुली दिल्यानंतर ते सत्पुरुष प्रकट झाले तेव्हा गोरक्षनाथ त्यांना म्हणाले, ''मी हरलो पण मला एक सांगा तुम्ही कुठे दडून बसला होतात? कोणती सिद्धी वापरली होती तुम्ही?'' त्या सत्पुरुषाने उत्तर दिले, ''तुला वाटतंय ते खोटं आहे. मी कोणतीही सिद्धी वापरली नाही. मी आकाशामध्ये आकाश होऊन राहिलो, पाण्यामध्ये पाणी होऊन राहिलो आणि हवेमध्ये हवा होऊन राहिलो! तुला मिळणारच कुठे मी? तू कितीही शोधलं असतंस तरी सापडलो नसतो मी!''

हेच दत्तशक्तीचं खरं रूप आहे ज्याचं दर्शन त्यांनी गोरक्षनाथांना दिलं. दत्तशक्तीच्या या संपूर्ण ब्रह्मांडव्यापी स्वरूपाचे गोरक्षनाथांना तेव्हाच दर्शन झालं जेव्हा त्यांनी श्रीदत्तात्रेयांसमोर संपूर्ण शरणागती पत्करली. जिथे जिथे सद्गुरूंसमोर पूर्ण शरणागती होते तिथे तिथे साक्षात् ही दत्तशक्ती आविर्भूत झाल्याशिवाय रहात नाही कारण सद्गुरु रूपातच ही शक्ती नित्य निवास करते. जसं 'मंगलमूर्ती' म्हटलं की पुढं आपोआप 'मोरया' म्हटलं जातं तसं 'श्रीगुरुदेव' म्हटलं की पुढं 'दत्त' हाच शब्द मुखातून बाहेर पडतो, दुसरा कोणताही नाही! सत् शिष्यासाठी श्रीगुरु हेच देव असतात आणि तेच साक्षात् दत्तरूप असतात.

सगुण देह सद्गुरूंचा असला तरी त्यातील शक्ती सर्वोच्च गुरुतत्त्वाची असते. देह दृश्यरूपात असतो तर शक्ती अदृश्य असते. या शक्तीसमोर नव्वद अंशाचा कोन साधला, संपूर्ण साष्टांग शरणागती स्वीकारली की त्या शक्तीचं गमन सद्गुरूंच्या देहातून भक्ताच्या देहात होऊ लागतं. हा कोन नुसता देहाने होऊन उपयोग नाही तर मनाने शरणागती साधता आली पाहिजे. तिथे थोडा जरी संशय, शंका यापैकी काहीही असले तरी शक्तीचे गमन एकीकडून दुसरीकडे होत नाही. म्हणून ही शक्ती मिळण्याची पुढची अट म्हणजे सद्गुरूंवर आणि गुरुपरंपरेवर संपूर्ण विश्वास! संपूर्ण विश्वास असल्याशिवाय एकाग्रता होत नाही आणि एकाग्रतेशिवाय शक्तीचं संक्रमणही होत नाही.

पाराशरमाधव, मार्कंडेय पुराण किंवा अलिकडच्या काळात प. प. श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांनी रचलेले श्रीदत्तमाहात्म्य यासारख्या ग्रंथांमध्ये सद्गुरुरूपी दत्तात्रेयांचे विपुल वर्णन केलं आहे. त्यात उन्मनी अवस्थेतल्या दत्तात्रेयांचेही वर्णन केलं आहे. याचा अर्थ एवढाच की, एखाद्या सत्पुरुषाच्या देहाला एकदा आपण सद्गुरु मानलं आणि तिथे दत्तशक्तीचं अवतरण झालं आहे असं मान्य केलं की त्यानंतर त्या देहाच्या विविध व्यापारांबाबत कोणतीही शंका घेण्याचं कारण उरत नाही. कदाचित भौतिक दृष्टीने काही घटना, काही क्रिया आपल्याला विपरीत भासतीलही पण ईश्वरी नियमानुसार ते बरोबरच असतं. त्या विशिष्ट पायरीवर गेलेल्या सद्गुरूंना कुठल्याही पापाचं लेपन होऊ शकत नाही कारण ते त्या देहापासून अलिप्त असतात.

आपल्यासमोर त्यांनी उभं केलेलं देहाचं दृश्य रूप कदाचित फसवंही असू शकतं. कारण सगळेच जर नतमस्तक झाले तर त्या सगळ्यांचाच उद्धार होऊन जगाचं रहाट गाडगं पूर्ण थांबेल. तसं थांबणं उपयोगाचं नसतं त्यामुळे फसवणुकीचा खेळ केला जातो. कोणी दगड मारतं तर कोणी संशयाचं वातावरण निर्माण करतं. पण हे सगळे सद्गुरुतत्त्वाचे खेळ आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून सद्गुरु काय करतात, त्यांच्या देहाचे व्यापार कसे चालतात याला महत्त्व नसून ते काय सांगतात याला महत्त्व आहे. त्यांच्या मुखातून निघालेला प्रत्येक शब्द आज्ञा समजून त्याचं तंतोतंत पालन करावं लागतं. तिथे शंका आली की शक्ती मिळायची थांबलीच म्हणून समजा!

भगवान दत्तात्रेय किंवा आपले सगुण देहधारी सद्गुरु यांची नावं फक्त निरनिराळी असतील, परंतु दृश्य वेगळं असलं तरी अदृश्य एकच आहे, तिथे कोणताही फरक नाही हे अधिकारवाणीने, अनुभवाने सांगता येतं. संत एकनाथांनी केलेली आरती आपण अनेक वेळा म्हणतो, 'मी तू पणाची झाली बोळवण, एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान'. जनार्दनपंत हे एकनाथांचे गुरु. एकनाथांना त्या जनार्दनात श्रीदत्ताचं ध्यान लाभलं म्हणजे श्री दत्त आणि जनार्दनस्वामी एकच आहेत हे

...पान ३१ वर

पान २६ वरून... श्रीदत्तजयंती : विज्ञान आणि अध्यात्म

पक्कं समजलं. याचा अर्थ त्यांनी उपासनाही त्याच पद्धतीने केली. आरतीत उल्लेख केलेली ही गुरुनिष्ठा मूळ दत्तात्रेयांकडून गुरुपरंपरेच्या माध्यमातून चालत आलेली आहे. परंतु नुसत्या आरत्या म्हणून ही निष्ठा, ही शक्ती आपल्याला प्राप्त होऊ शकेल का? तर निश्चितच नाही! ती मिळण्यासाठी आपल्याला त्यातलं ज्ञान समजावून घेतलं पाहिजे, ते पचवलं पाहिजे, त्याचं कृतीमध्ये रूपांतर केलं पाहिजे. हे जर आपण करू शकलो नाही तर नुसता दत्तजयंतीचा उत्सव साजरा करून काहीच साध्य करता येणार नाही. स्वत: दत्तगुरूंनी चोवीस ज्ञानगुरु केले आणि त्या प्रत्येक गुरूंकडून त्यांनी फार मोठी शिकवण घेतली. जर आपल्याला त्यांच्या प्रतिमेशी एकरूप व्हायचं असेल तर ही ज्ञानजिज्ञासा आपल्यातही जागृत झाली पाहिजे तरच दत्त प्रतीकामधली शक्ती आपल्याला मिळायला सुरुवात होईल.

ईश्वराने मानवाला मेंदू दिला आहे. अध्यात्मातलं खरं ज्ञान मिळवलं, तरच त्या मेंदूचा सदुपयोग झाला असं म्हणता येतं. ते ज्ञान पचवायचं म्हणजे सद्गुरूंशी, त्यांच्या विचारांशी सतत अनुसंधान साधून त्याचं चिंतन करायचं. चिंतनानंतर तो विचार कृतीत उतरवून आपल्या आचार विचारांमध्ये बदल करणं ही या प्रक्रियेतली शेवटची आणि महत्त्वाची पायरी आहे. एखाद्या पोपटाला शिकवलं की, 'मांजर आलं की उडायचं.' पण खरोखरचा बोका आल्यानंतर उडायचं सोडून जर तो पोपट नुसतं म्हणत राहिला की 'मांजर आलं की उडायचं, मांजर आलं की उडायचं' तर त्याचा काही उपयोग होईल का? तसंच अध्यात्म विज्ञान समजून घेऊनही जर आपण त्याचं कृतीत रूपांतर करू शकलो नाही तर तो काळरूपी बोका आपल्याला कधी फस्त करेल याचा पत्ताही लागणार नाही.

दत्तजयंतीच्या दिवशी अवतरित होणारी दत्तशक्ती न दिसणारी, अव्यक्त आणि निराकार असली तरी तिला श्रद्धेच्या आणि ज्ञानाच्या जोरावर जाणून घ्यायचं आहे, समजून घ्यायचं आहे आणि प्रत्येक दत्तभक्ताने ती शक्ती ग्रहण करण्याचा प्रयत्न करायचा आहे. सद्गुरूंच्या स्थानी एकत्र येऊन संपूर्ण शरणागतीसह त्या सद्गुरुरूपी दत्तात्रेयांच्या मूळ स्वरूपावर एकाग्रता साधण्याचा संकल्प करणं, हीच दत्तात्रेय जयंती सोहोळ्याची खरी फलश्रुती होय!